28 SEP 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दगडी पाला वनस्पती ४२ प्रकारच्या फुलपाखरांची लाडकी

## शिवाजी विद्यापीठातील आरती पाटील यांचे संशोधन; आंतरराष्ट्रीय पत्रिकेत शोधनिबंध

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २७ : दगडी पाला (ट्रायडॅक्स प्रोकम्बन्स) ही वनस्पती कंबरमोडी, एकदांडी, बंदुकीचे फूल अशा अनेक नावांनी ओळखली जाते. त्या वनस्पतीचे निसर्गामधील प्रयोजन शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागातील संशोधकांनी सिद्ध केले आहे. काहीशा दुर्लक्षित या वनस्पतीच्या फुलांवर मकरंद खाण्यासाठी आलेल्या ४२ प्रजातीच्या फुलपाखरांची नोंद आरती पाटील या संशोधक विद्यार्थिनीने केली आहे.

या सर्व नोंदी विद्यापीठाच्या परिसरामध्येच केलेल्या आहेत.



आरती पाटील



सुनील गायकवाड

त्यांचा हा शोधनिबंध 'जर्नल ऑफ थ्रेटन्ड टॅक्सा' या आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेमध्ये गुरुवारी प्रकाशित झाला. डॉ. सुनील गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आरती यांनी दगडी पाला या प्रजातीवर मकरंद टिपण्यासाठी वर्षभरात येणाऱ्या फुलपाखरांच्या प्रजातींची निरीक्षणे करून नोंदी घेतल्या. फुलपाखरांची कोणती प्रजाती, कोणत्या कालावधीत, कोणत्या वेळी या फुलावर येते, त्यावेळचे हवामान, तापमान, आर्द्रता यांच्याही नोंदी घेतल्या.



दगडी पाला वनस्पती फुलपाखरांना आवडते.

या संशोधनानुसार तृणकणी या भारतातल्या सर्वात लहान फुलपाखरासह ग्रास ज्वेल, रूपरेखा, मयूर भिरभिरी, ऊर्वशी, मोठा चांदवा, गौरांग, कवडशा, हबशी, चित्ता या आणि इतर अशा एकूण ४२ फुलपाखरांच्या प्रजातींची नोंद या संशोधनात करण्यात आली. निसर्गामध्ये उपलब्ध असलेल्या प्रत्येक लक्षित-दुर्लक्षित प्रजातीचे तिचे स्वतःचे असे एक अस्तित्व आणि प्रयोजन असते. या विधानाची प्रचिती देणारे हे संशोधन आहे.

> “ या संशोधनामुळे दगडी पाला आणि तत्सम दुर्लक्षित वनस्पतींचे फुलपाखरांच्या तसेच जैवविविधता संवर्धनातील महत्त्व अधोरेखित झाले आहे. यापूर्वी दगडी पाला आणि फुलपाखरू यांच्या परपस्परसंबंधांबाबत प्रकाशित झालेल्या शोधनिबंधांत नोंद केलेल्या फुलपाखरांच्या प्रजातींपेक्षाही अधिक प्रजाती सदरच्या अभ्यासांतर्गत नोंदवल्या गेल्या. त्यातून विद्यापीठ परिसराचेही जैवविविधता संवर्धनातील महत्त्व ठळकपणे सामोरे आले आहे.
>
> **- डॉ. सुनील गायकवाड**, संशोधक मार्गदर्शक

28 SEP 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रानमाळातील एक वनस्पती... फुलपाखरांच्या ४२ प्रजातींची लाडकी!

## शिवाजी विद्यापीठाचे संशोधन : आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकेत प्रसिद्ध

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** दगडी पाला, कंबरमोडी, एकदांडी किंवा बंदुकीचे फूल अशा अनेक नावांनी ओळखल्या जाणाऱ्या आणि रस्त्याच्या कडेने, रानावनात आढळणाऱ्या वनस्पतीचे निसर्गामधील प्रयोजन शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागातील संशोधकांनी सिद्ध केले.

दगडी पाला वनस्पतीच्या फुलांवर मकरंद खाण्यासाठी आलेल्या ४२ प्रजातींच्या फुलपाखरांची नोंद आरती पाटील या संशोधक विद्यार्थिनीने केली.



आरती पाटील



सुनील गायकवाड

डॉ. सुनील गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली या सर्व नोंदी विद्यापीठाच्या परिसरामध्येच केल्या आहेत. त्यांचा हा शोधनिबंध 'जर्नल ऑफ थ्रेटन्ड टॅक्सा' या आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेमध्ये २६ सप्टेंबरला प्रकाशित झाला.

या संशोधनानुसार तृणकणी या भारतातल्या सर्वांत लहान फुलपाखरासह ग्रास ज्वेल, कॉमन शॉट सिल्व्हरलाइन (रूपरेखा), पिकॉक पॅन्सी (मयूर भिरभिरी), पेंटेड लेडी (उर्वशी), ग्रेट एग फ्लाय, (मोठा चांदवा), पायोनिअर व्हाईट (गौरांग), अशा ४२ फुलपाखरांच्या प्रजातींची नोंद या संशोधनाअंतर्गत केली.

> या संशोधनामुळे दगडी पाला आणि तत्सम दुर्लक्षित वनस्पतींचे फुलपाखरांच्या संवर्धनातील महत्त्व अधोरेखित झाले आहे. विद्यापीठ परिसराचेही जैवविविधता संवर्धनातील महत्त्व सामोरे आले आहे.
>
> \- डॉ. सुनील गायकवाड



दगडी पाला वनस्पतीवर फुलपाखरांच्या काही निवडक प्रजाती आढळून आल्यात

2 8 SEP 2024 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एकाच वनस्पतीवर ४२ फुलपाखरांच्या प्रजातींची नोंद

## शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागाचे संशोधन : सर्व नोंदी विद्यापीठ परिसरात :आंतरराष्ट्रीय संशोधन शोधपत्रिकेत प्रसिद्ध



दगडी पाला वनस्पतीवर आढळलेल्या फुलपाखरांच्या काही निवडक प्रजातींची छायाचित्रे.

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागातील संशोधकांनी वनस्पतीचे निसर्गामधील प्रयोजन सिद्ध करत रानावनात कोठेही सहज आढळणाऱ्या ट्रायडॅक्स प्रोकम्बन्स (Tridax procumben) अर्थात दगडी पाला वनस्पतीच्या फुलांवर मकरंद खाण्यासाठी. आलेल्या ४२ प्रजातीच्या फुलपाखरांची नोंद केली आहे. कंब्रमोडी, एकदांडी किंवा बंदुकीचे फूल अशा अनेक नावांनी ओळखल्या जाणाऱ्या आणि रस्त्याच्या कडेने कोठेही सहज आढळणाऱ्या दगडी पाला वनस्पतीवरील फुलपाखरांचे अस्तित्व सिद्ध केले आहे.

शिवाजी विद्यापीठातील संशोधक मार्गदर्शक डॉ. सुनील गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली प्राणिशास्त्र अधिविभागातील संशोधक विद्यार्थीनी आरती पाटील हिने फुलपाखरांची नोंद केली आहे. विशेष म्हणजे या सर्व नोंदी शिवाजी विद्यापीठाच्या परिसरामध्येच केलेल्या आहेत. त्यांचा हा शोधनिबंध 'जर्नल ऑफ थ्रेटन्ड टॅक्सा' या आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेमध्ये गुरूवारी प्रकाशित झाला आहे.

### जर्नल ऑफ थ्रेटन्ड टॅक्सा विषयी

जर्नल ऑफ थ्रेटन्ड टॅक्सा (व्दऊऊ) हे आंतरराष्ट्रीय नियतकालिक जैवविविधता संवर्धन आणि प्राण्यांचे वर्गीकरण यावरील शोधनिबंध प्रसिद्ध करते. दुर्मिळ व अस्तित्व धोक्यात आलेल्या प्रजातींच्या अनुषंगाने असलेले संशोधन यात प्राधान्याने प्रकाशित केले जाते. या नियतकालिकाचा समावेश स्कोपस, वेब ऑफ सायन्स, यूजीसी केअर लिस्ट अशा नामांकित इंडेक्सिंग एजन्सीमध्ये आहे. त्याचे नॅस रेटिंग ५.५६ इतके असून एच इंडेक्स १५ आहे.

आरती पाटील यांनी दगडी पाला या प्रजातीवर मकरंद टिपण्यासाठी वर्षभरात येणाऱ्या फुलपाखरांच्या प्रजातींची अत्यंत शिस्तबद्ध निरीक्षणे करून नोंदी घेतल्या. फुलपाखरांची कोणती प्रजाती, कोणत्या कालावधीत, कोणत्या वेळी या फुलावर येते, त्यावेळचे हवामान, तापमान, आर्द्रता यांच्याही नोंदी घेतल्या. या संशोधनानुसार तृणकणी या भारतातल्या सर्वात लहान फुलपाखरासह ग्रास ज्वेल, कॉमन शॉट सिल्व्हरलाईन (रूपरेखा), पिकॉक पॅन्सी (मयूर भिरभिरी), पेंटेड लेडी (उर्वशी), ग्रेट एग फ्लाय, (मोठा चांदवा), पायोनिअर व्हाईट (गौरांग), कॉमन गुल (कवडशा), कॉमन क्रो (हबशी), कॉमन लेपर्ड (चित्ता) या आणि इतर अशा एकूण ४२ फुलपाखरांच्या प्रजातींची नोंद या संशोधनाअंतर्गत करण्यात आली आहे. 'अ स्टडी ऑन दि असोसिएशन बिटविन ट्रायडॅक्स डेझी ट्रायडॅक्स प्रोकम्बन्स एल. अँन्ड बटरफ्लाईज अॅट शिवाजी युनिव्हर्सिटी कॅम्पस (महाराष्ट्र, इंडिया)' या शीर्षकाखाली संशोधन पत्रिकेमध्ये प्रकाशित झाले आहे.



आरती पाटील



डॉ. एस.एम. गायकवाड

> दगडी पाला आणि तत्सम दुर्लक्षित वनस्पतींचे फुलपाखरांच्या तसेच जैवविविधता संवर्धनातील महत्व अधोरेखित झाले आहे. यापूर्वी दगडी पाला आणि फुलपाखरू यांच्या परपस्परसंबंधांबाबत प्रकाशित झालेल्या शोधनिबंधांत नोंद केलेल्या फुलपाखरांच्या प्रजातींपेक्षाही अधिक प्रजाती सदरच्या अभ्यासांतर्गत नोंदवल्या गेल्या आहेत.
>
> **-डॉ. एस.एम. गायकवाड**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 SEP 2024
लोकमत

# लघुपटात शास्त्रीय प्रक्रियेचा अवलंब हवा : मुकुंद खुपेरकर

## विद्यापीठात 'गोंधळ' लघुपटाचे स्क्रीनिंग

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : लघुपट निर्मिती सामूहिक कष्टाचे फलित असते. लघुपटामध्ये तांत्रिक बाबींबरोबरच शास्त्रीय



प्रक्रियेचा अवलंब करणे आवश्यक आहे, असे मत 'गोंधळ' लघुपटाचे दिग्दर्शक मुकुंद खुपेरकर यांनी शुक्रवारी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रमाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात लघुपटाची निर्मितीप्रक्रिया या विषयावर ते बोलत होते. 'गोंधळ' या लघुपटाचे स्क्रीनिंग करण्यात आले.

खुपेरकर म्हणाले, लघुपटांकडे मनोवैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहायला पाहिजे, तरच ती कलाकृती उत्तम होऊ शकते. निर्माता अमित चव्हाण म्हणाले, निर्मात्याने बजेट घातले म्हणून सर्व निर्णय स्वतः घेण्याची गरज नाही. दिग्दर्शकाला त्याने स्वातंत्र्य दिले तर निश्चितपणे उत्तम पद्धतीचा लघुपट तयार होऊ शकतो.

अभिनेत्री अस्मिता खटावकर यांनी अभिनयासंदर्भात विद्यार्थ्यांशी संवाद साधला. डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत केले. पार्थ मालवणकर याने सूत्रसंचालन केले. अवधूत चव्हाण याने आभार मानले.